# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**डॉ. शाकेरा इनामदार**
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
**कार्यक्रम समन्वयक**

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१

संदर्भ : रासेयो/८२६/१३ दि : १३ ऑगस्ट २०१३

प्रति
मा. प्राचार्य/ कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे शहर

विषय: Tree Census project करीता रासेयो स्वयंसेवक पाठविणेबाबत...

महोदय,

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या कायद्यान्वये शहरातील विद्यमान वृक्षांची गणना करण्यात येत आहे. तसेच उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार वृक्षगणनेमध्ये तांत्रिक ज्ञानाचा आणि लोकसहभागाचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेण्यात येईल याकरीता पुणे महानगरपालिका अंतर्गत Tree Census project राबविण्यात येत आहे. त्यानुसार पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व महानगरपालिका पुणे, जनवाणी केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण विषयावर आधारीत Tree Census project पुणे शहरात राबविण्याकरीता रासेयो स्वयंसेवकांची एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दि. १६ ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी १०.०० ते २.०० या वेळेत रासेयो विभाग, पुणे विद्यापीठ याठिकाणी आयोजित करण्यात येत आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील १० रा.से.यो. स्वयंसेवक यांना दि. १६ ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता सदर प्रशिक्षण कार्यशाळेकरीता पाठवावे ही विनंती. कार्यशाळेकरीता स्वयंसेवकांची निवड करतांना शक्यतो पर्यावरणशास्त्र, वनस्पती शास्त्र भूगोल, तसेच पर्यावरण विषयाची आवड व माहिती असणाऱ्या स्वयंसेवकांना प्राधान्य देण्यात यावे ही विनंती.
(प्रशिक्षण कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना त्यापुढील तीन दिवस पुणे शहरात Tree Census सर्व्हेकरीता उपस्थित रहावे लागणार आहे.) (फक्त पुणे शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता)

**कळावे,**

**आपली विश्वासू,**

**कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**